ijamrsd.com JAMRSD ISSN: 2583-6404
Journal of Advanced Multidisciplinary Research Studies and Development
Peer Reviewed Referred Journal Bi-monthly Open Access

# प्रधानमंत्री जनधन योजनेची परिणामकारकता

**मनोज आधार भोई**
*विषय– अर्थशास्त्र, जे. के. शाह आदर्श कला व वाणिज्य, महाविद्यालय, निजामपूर-जैताणे, ता. साक्री, जि. धुळे.*
*Email: bhoimanoj89@gmail.com*

**सारांश:**
आर्थिक समावेशन साध्य करण्यासाठी जनधन योजना एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते. जनधन योजनेमुळे देशातील करोडो लोकांना प्रथमच बँकिंग व्यवस्थेची जोडले गेले. बँक आणि बँक प्रतिनिधी यांच्या माध्यमातून ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांचे खाते उघडण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली. यामुळे शेतकरी, महिला, कामगार आणि लहान उद्योजकांचे आर्थिक सशक्तीकरण झालेले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील या महिलांनी प्रथमच स्वतःच्या नावाने बँक खाते उघडले आणि व्यवहाराला सुरुवात केली. ज्यामुळे महिलांची आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू झाली. या योजनेअंतर्गत महिलांना अपघाती विमा आणि जीवन विमा संरक्षणामुळे कुटुंबांना आर्थिक सुरक्षितता मिळण्यास मदत झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील धुळे हा प्रमुख जिल्हा असून या जिल्ह्यात आर्थिक समावेशन वेगाने वाढले आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत सामाजिक आणि आर्थिक गटांमध्ये बँक खाते उघडण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.

**मुख्य शब्द:** कृषीप्रधान अर्थव्यवस्था, आर्थिक समावेशन, रूपेडेबिट कार्ड, थेट लाभ हस्तांतरण, आर्थिक साक्षरता, डिजिटल व्यवहार, सक्षमीकरण इ.

► *Corresponding Author: मनोज आधार भोई*

**प्रास्ताविक:-**
भारतासारख्या विशाल आणि 'कृषीप्रधान अर्थव्यवस्था' असलेल्या तसेच विविधतेने नटलेल्या देशात सर्वसामान्य जनतेला बँकिंग सेवांच्या कक्षेत आणणे ही काळाची आवश्यकता व मोठी गरज होती. ग्रामीण भागातील वंचित आणि आर्थिक दुर्बल घटकांना बँकिंग सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत होते. सावकारांच्या कर्ज सापळ्यात अडकत होते. या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २८ ऑगस्ट २०१४ रोजी 'प्रधानमंत्री जनधन योजना' सुरू करण्यात आली. देशात प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत ५३.५८ कोटी खाती उघडण्यात आली. आर्थिक समावेशन साध्य करण्यासाठी जनधन योजना एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते. जनधन योजनेत निमशहरी आणि ग्रामीण भागातील ६७% पेक्षा जास्त खाती उघडली गेली असून त्यात ५५% पेक्षा जास्त महिलांचा सहभाग आहे. देशातील प्रत्येक कुटुंबापर्यंत बँकिंग सुविधा पोहोचवणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्टे आहे. 'प्रत्येक घरात बँक खाते' हा या योजनेच्या मूलमंत्र आहे. या योजनेअंतर्गत शून्य शिल्लक बँक खाते उघडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

देशातील गरीब आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना बँक खाते उघडणे, बचत सुविधा, कर्ज, निवृत्तीवेतन आणि विमा यासारख्या आर्थिक सेवांचा लाभ देणे हे या योजनेचे ध्येय आहे. याचा फायदा नागरिकांना सुरक्षित बचत, थेट लाभ हस्तांतरण, शासकीय अनुदाने आणि विविध योजनांचे पैसे थेट खात्यात मिळू लागले आहेत. या योजनेत बँक खातेधारकाला रूपेडेबिट कार्ड देण्यात येते. या डेबिट कार्डच्या सहाय्याने पैसे काढणे, खरेदी करणे तसेच डिजिटल व्यवहार करणे शक्य झाले आहे. याबरोबरच अपघाती विमा संरक्षणाची सुविधा देखील देण्यात आली आहे. या खात्याअंतर्गत खातेधारकाने सहा महिन्यात समाधानकारक व्यवहार केल्यास त्यांना या खात्यावर ओव्हरड्रॉपची सुविधा मिळू शकते. त्यामुळे खातेधारकास गरज पडल्यावर बँकांकडून कर्जाचीही सुविधा देण्यात येते.

जनधन योजनेमुळे देशातील करोडो लोकांना प्रथमच बँकिंग व्यवस्थेची जोडले गेले. बँक आणि बँक प्रतिनिधी यांच्या माध्यमातून ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांचे खाते उघडण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली. यामुळे शेतकरी, महिला, कामगार आणि लहान उद्योजकांचे आर्थिक सशक्तीकरण झालेले आहे. या कल्याणकारी योजनेअंतर्गत सरकारकडून जनतेला दिले जाणाऱ्या अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होऊ लागल्यामुळे भ्रष्टाचार आणि मध्यस्थांची संख्या कमी झालेली आहे. भारत सरकारकडून विशेषतः कोविड-१९ काळात महिलांच्या जनधन खात्यात थेट अनुदान हस्तांतरित करण्यात आले. त्यामुळे या संकटाच्या काळात अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१) प्रधानमंत्री जनधन योजनेच्या संकल्पनेचे अध्ययन करणे.

२) धुळे जिल्ह्यातील जनधन योजनेच्या प्रगतीचे अध्ययन करणे.

**माहितीचे संकलन:-**

'प्रधानमंत्री जनधन योजनेची परिणामकारकता' या संशोधन पेपर मध्ये माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन पेपर, लेख, पुस्तके व
शासकीय अहवाल ई. दुय्यम साधनांची मदत घेण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील जनधन योजनेची प्रगती:-**

महाराष्ट्र राज्यात जनधन खाते असलेले महिला खातेदारांची संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. महिला बचत गट तसेच स्वयंसहायता गटांद्वारे जनजागृती करून महिलांना बँक क्षेत्रा संदर्भात माहिती देऊन बँक प्रणालीशी जोडण्यात आले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील या महिलांनी प्रथमच स्वतःच्या नावाने बँक खाते उघडले आणि व्यवहाराला सुरुवात केली. ज्यामुळे महिलांची आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू झाली. या योजनेअंतर्गत महिलांना अपघाती विमा आणि जीवन विमा संरक्षणामुळे कुटुंबांना आर्थिक सुरक्षितता मिळण्यास मदत झाली आहे.

कोरोना महामारीच्या काळात म्हणजेच लॉकडाऊनच्या काळात महाराष्ट्रातील लाखो खातेधारकांना थेट खात्यात आर्थिक मदत शासनाने पाठवली आहे. त्यामुळे अडचणीच्या काळात जनधन खाती हा आधारस्तंभ ठरला आहे. शहरी आणि ग्रामीण भागात ग्राहक सेवा केंद्र तसेच बँक मित्र यांच्यामार्फत पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. अनेको जनधन च्या खात्यांमध्ये नियमित व्यवहार सुरू सुरू झाल्याने महाराष्ट्रातील जनधन खात्यांमध्ये शून्य शिल्लक  खात्यांच्या व्यवहारात हळूहळू वाढ झालेली आहे. केंद्र व राज्य सरकारने वेळोवेळी आर्थिक साक्षरतेचे अभियान राबवून नागरिकांना बचत, विमा, कर्ज आणि डिजिटल व्यवहारांविषयी मार्गदर्शन केले आहे. यावरून राज्यात आर्थिक साक्षरतेत वाढ झाल्याचे दिसते. राज्यात प्रधानमंत्री जनधन योजनेची प्रगती पुढील सारणीत दिलेली आहे.

**सारणी – १**

**महाराष्ट्रातील प्रधानमंत्री जनधन योजनेची प्रगती**

| अ. क्र. | वर्ष | उघडण्यात आलेली खाती | देण्यात आलेली रुपये कार्ड | एकूण ठेवी (कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१ | २,९९,६८,८०३ | २,०९,१८,२१२ | १०,०६,७२१ |
| २ | २०२२ | ३,१३,९०,७२७ | २,१७,८८,५५० | १०,८७,३२४ |
| ३ | २०२३ | ३,२४,०५,०२३ | २,२२,०३,१८१ | १२,०५,१८८ |
| ४ | २०२४ | ३,४०,८१,२१५ | २,३६,२८,५०० | १४,४७,५०० |

(स्त्रोत - महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०२१ ते २०२४)

संपूर्ण महाराष्ट्रात २०२१ मध्ये २.९९ कोटी पेक्षा अधिक लोकांचे या योजनेअंतर्गत खाते उघडण्यात आले. यात सतत वाढ होत गेली आणि २०२४ मध्ये ३.४१ कोटी खाते उघडण्यात आले आहेत. २०२२ मध्ये संपूर्ण भारतात या योजनेअंतर्गत २९ कोटी खाते उघडण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात 'प्रधानमंत्री जनधन योजना' ही आर्थिक समावेशनाच्या दृष्टीने क्रांतिकारी मानली जाते. शहरी व ग्रामीण भागातील गरीब आणि आदिवासी घटकांना बँकिंग प्रणालीशी जोडण्यात या जनधन योजनेने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. डिजिटल व्यवहार, विमा संरक्षण आणि थेट लाभ हस्तांतरण यामुळे नागरिकांच्या राहणीमानात आणि आर्थिक जीवनात कल्याणकारी सकारात्मक बदल झालेले आहेत.

**धुळे जिल्ह्यातील जनधन योजनेचा आढावा:-**

भारतातील 'प्रधानमंत्री जनधन योजना' ही सर्वात मोठी आर्थिक समावेशन योजना आहे. महाराष्ट्र राज्यातील धुळे हा प्रमुख जिल्हा असून या जिल्ह्यात आर्थिक समावेशन वेगाने वाढले आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत सामाजिक आणि आर्थिक गटांमध्ये बँक खाते उघडण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.

**सारणी – २**

**धुळे जिल्ह्यातील प्रधानमंत्री जनधन योजनेचा आढावा**

| अ. क्र. | वर्ष | उघडण्यात आलेली खाती | देण्यात आलेली रुपये कार्ड | एकूण ठेवी (कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१ | ७,४९,८८८ | ४,९७,०७९ | १५,५१९ |
| २ | २०२२ | ७,०२,३६१ | ४,९७,३२५ | १५,१७८ |
| ३ | २०२३ | ७,३४,२५७ | ५,१६,९०९ | १८,९५९.६५ |
| ४ | २०२४ | ७,९३,४०१ | ५,५१,०११ | २२००० |

(स्त्रोत - महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०२१ ते २०२४)

धुळे जिल्ह्यातील प्रधानमंत्री जनधन योजनेचा थोडक्यात आढावा वरील सारणी दिलेला आहे. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन यांच्या आकडेवारीनुसार दिसते की, २०२१ मध्ये ७,४९,८८८ इतकी प्रधानमंत्री जनधन योजनेत खाती उघडण्यात आली आहेत. याच वर्षात या योजनेअंतर्गत ४,९७,०७९ इतकी रुपेकार्ड वितरित करण्यात आले असून १५,५१९ कोटी रुपयांची एकूण ठेवी मिळाल्या आहेत. २०२४ मध्ये ७,९३,४०१ इतकी शून्य शिल्लक खाते उघडण्यात आली. या योजनेअंतर्गत २२००० कोटींच्या ठेवी निर्माण झाल्या आहेत.

२०२१ ते २०२४ या चार वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यात जवळपास ८ लाख जनधन योजनेची खाती उघडण्यात आली. खाते उघडण्याचे प्रमाण, रूपेकार्डचे वितरण आणि एकूण ठेवींमध्ये उत्तरोत्तर वाढ झालेली दिसून येते.

**निष्कर्ष:-**

'प्रधानमंत्री जनधन योजना' ही भारतातील आर्थिक समावेशनाच्या दिशेने उचललेले क्रांतिकारी पाऊल आहे. या योजनेमुळे देशातील कोट्यावधी जनतेला बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले आहेत. त्यामुळे लोकांच्या जीवनमानात व राहणीमानात बदल झालेली दिसून येते. भारतातील सामान्य जनता बचत, विमा, कर्ज आणि डिजिटल व्यवहार यांच्या माध्यमातून सक्षम होत आहेत. त्यामुळे जनधन योजना केवळ बँक खाते उघडण्यापूर्वी सर्वसामान्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाची व्यापक चळवळ आहे.

देशातील लोकांनी सावकारांवर अवलंबून राहण्याऐवजी बँकिंग सेवांचा वापर सुरू केला आहे. डिजिटल व्यवहारांची संख्या वाढलेली असून देश डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करू लागला आहे. महिलांच्या नावावर शून्य शिल्लक खाती उघडली गेली असून त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढलेले दिसून येते. देशातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

प्रधानमंत्री जनधन योजनेने धुळे जिल्ह्यात बँकिंग सेवा सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. शहरी व ग्रामीण भागातील महिलांच्या सहभाग आर्थिक समावेशनाची दिशा मजबूत होण्यास मदत झालेली दिसून येते. योजनेमुळे आर्थिक समावेशनाकडे वाटचाल करण्यास मदत मिळाली आहे. गरीब व वंचित घटक मुख्य प्रवाहात आले असून त्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ मिळू लागला आहे. बँकिंग सेवांमुळे पारदर्शकता वाढली आणि अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त झाले आहे.

**संदर्भ:-**

१) मनोरमा इयर बुक – २०२२
२) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन २०२१
३) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन २०२२
४) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३
५) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन २०२४
६) www.pmjdy.gov.in